# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- १२१ दिनांक :- ०३/०९/२०२६

## " नशिराबाद पोलिसांकडून ३.५३८ किलो गांजासह दोन आरोपी जेरबंद; २ लाख ५३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त "

**अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत जळगाव जिल्हा पोलीस दलाने आणखी एक महत्त्वपूर्ण कारवाई करत नशिराबाद पोलीस स्टेशनचे पथकाकडुन ३.५३८ किलो ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईत एकूण २,५३,५००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून ०२ आरोपीतां अटक कराण्यात आली आहे.**

**मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी "नशामुक्त भारत (Nasha Mukta Bharat)" अभियानांतर्गत** संपूर्ण जळगाव जिल्ह्यात अवैध अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक व सेवन यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी गोपनीय माहिती संकलित करून मोठ्या प्रमाणात प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकारी देण्यात आल्या.

त्यानुषंगाने नशिराबाद पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, श्रीमती योगिता नारखेडे यांनी त्यांच्या अधीपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार यांना अंमली पदार्थ बाबत जास्तीत जास्त गोपनिय माहिती संकलीत करुन कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

तयार करण्यात आलेल्या पथकाला गोपनिय बातमीदारकडून माहिती मिळाली की, नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नशिराबाद गावातील साती बाजार चौक येथे दोन इसम अंमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री करीता वाहतुक करणार आहे. मिळालेल्या माहितीची पडताळणी करत दिनांक ०२ सप्टेंबर, २०२६ रोजी रात्री नशिराबाद गावातील साती बाजार चौक येथे गस्त घालत असताना संशयास्पद हालचाल करणाऱ्या **आरोपी १) राजेश भारत बांटूगे वय ३१ वर्षे रा. महादेव मंदिराजवळ तांबापुरा, जळगांव २) सुभाष सोमा मराठे वय ६८ रा. सातीबाजार, नशिराबाद, जळगांव याला ताब्यात घेण्यात आले.** त्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात असलेल्या मोटरसायकलच्या डिक्कीत गांजा हा अंमली पदार्थ आढळून आला. त्यानंतर सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**१. १,००,०००/- रु किंमतीचा २१०८ ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ (प्लास्टीक पिशवीसह वजन)**
**२. ७१,५००/- रु किंमतीचा १४३० ग्रॅम वजनाचा गांजा (अर्धवट सुकलेला काडया व बिया)**
**३. ७०,०००/- रु किंमतीची हॉडा कंपनीची शाईन मोटर सायकल MH-19-CD-9574**
**४. १०,०००/- रु किंमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन**

५. २०००/- रु किंमतीचा भारत कंपनीचा मोबाईल फोन

------------------------------------------------------------------------

एकुण २,५३,५००/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

सदर बाबत दोन्ही आरोपीतां विरुध्द **नशिराबाद पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. २५०/२०२६ एनडीपीएस कायदा कलम २०(ब), (II), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रिया दातीर, नशिराबाद पोलीस स्टेशन हे करीत आहेत.**

**" जळगाव जिल्ह्यात अंमली पदार्थांची अवैध विक्री, वाहतूक व सेवन करणाऱ्यांविरुद्ध पोलीस दलामार्फत सातत्याने कठोर कारवाई करण्यात येत आहे. अंमली पदार्थाच्या अवैध व्यवहाराबाबत नागरिकांना कोणतीही माहिती मिळाल्यास ती तत्काळ पोलिसांना कळवावी, असे मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे तर्फे करण्यात येत आहे.**

**"नशामुक्त जळगांव- सुरक्षित जळगाव" या उद्देशाने अंमली पदार्थांविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहे "**

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, श्री. केदार बारबोले, उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नशिराबाद पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्रीमती योगिता नारखेडे यांच्या नेतृत्वातील पोलीस उप निरीक्षक प्रिया दातीर, पोहेकॉ/गुणवंत देशमुख, पोहेकॉ/चंद्रकांत पाटील, पोहेकॉ/ प्रशांत विरणारे, पोहेकॉ/ गिरीश शिंदे, पोहेकॉ/अनिल देशमुख, पोकॉ/भरत बाविस्कर, पोकॉ/पंकज सोनवणे, पोकॉ/प्रविण लोहार, पोकॉ/सागर भिडे, पोकॉ/विठ्ठल मुंडे यांचे पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**SD/-**
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव

प्रति,

सर्व संपादक/वार्ताहार
प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया
२/- जनहितार्थ प्रसारण करीता

********************************************************************************

